# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 05 April 2025

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: ०५ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- पुण्याच्या दीनानाथ रुग्णालयातील घटनेच्या चौकशीचे मुख्यमंत्र्यांचे आदेश-राज्यभरात धर्मादाय रुग्णालयांमध्ये आरोग्यदूत नेमण्यात येणार
- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा समारोप-दोन्ही सदनांचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब
- ज्येष्ठ अभिनेते मनोजकुमार यांचं निधन-आज मुंबईत अंत्यसंस्कार

आणि

- नांदेड जिल्ह्यात ट्रॅक्टर विहिरीत कोसळून सात महिला शेतमजुरांचा मृत्यू

****

पुण्याच्या दीनानाथ रुग्णालयातील घटनेच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या घटनेची चौकशी करण्यासाठी पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. यासंदर्भात मुख्यमंत्री सहायता कक्षाने संपर्क साधूनही रुग्णालयाकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचं सांगत, कठोर कारवाईचे संकेत मुख्यमंत्र्यांनी दिले. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, या प्रकरणी जे दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिला, त्या काल नाशिक इथं पत्रकारांशी बोलत होत्या. अशा घटना टाळण्यासाठी राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये एक आरोग्यदूत नेमणार असल्याचंही मिसाळ यांनी सांगितलं.

****

केंद्रीय मंत्रिमंडळाने देशातल्या चार रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली, एकूण १८ हजार ६५८ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पांमध्ये गोंदिया बल्लारशा मार्गाच्या दुहेरीकरण कामाचा समावेश आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. चार हजार ८१९ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे विदर्भ तसंच मराठवाडा विभागाला लाभ होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले..

**बाईट – अश्विनी वैष्णव, मंत्री, माहिती प्रसारण**

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा काल समारोप झाला. दोन्ही सदनांचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब झाल्याची घोषणा करण्यात आली. या अधिवेशन काळात लोकसभेत ११८ टक्के तर, राज्यसभेत ११९ टक्के कामकाज झालं. वक्फ सुधारणा विधेयकासह लोकसभेत १६ तर राज्यसभेत १४ विधेयकं संमत झाल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली.

दरम्यान, संसदेत वक्फ सुधारणा विधेयक पारीत झाल्याबद्दल लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यातील तळेगाव इथं साखर वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. तळेगावातल्या जवळपास ३०० एकर जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा केला होता. या पार्श्वभूमीवर सदर कायदा दिलासा देणारा असल्यानं नागरिकांनी आनंद व्यक्त केला.

****

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात, आरोपींना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करण्याचे निर्देश, गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले आहेत. कदम यांनी काल मस्साजोग इथं संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि सहआरोपींना बीड कारागृहातून इतर कारागृहात हलवण्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चेचं आश्वासन त्यांनी दिलं.

दरम्यान, राज्यमंत्री कदम यांनी काल जालना इथं विविध विभागांची आढावा बैठक घेतली. बांधकाम कामगार माध्यान्ह भोजन योजना, औषधी दुकानावरुन नशेच्या गोळ्यांची विक्री, महिला बचत गटासाठी मॉलचा प्रस्ताव, आदी विषयांचा आढावा घेऊन कदम यांनी आवश्यक त्या सूचना केल्या.

****

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कार्यक्रम अंमलबजावणीत धाराशिव जिल्ह्याला सहा विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत. जागतिक आरोग्य दिनी परवा सात एप्रिलला मुंबईत या पुरस्कारांचं वितरण होणार आहे. याबाबत आमच्या वार्ताहरानी अधिक माहिती दिली..

**बाईट – देविदास पाठक**

****

२०२४-२५ या आर्थिक वर्षांत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचं १०३ टक्के उद्दीष्ट पूर्ण झालं आहे. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्नील राठोड यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यातील एक हजार १५ तरुणांनी या योजनेचा लाभ घेत, स्वतःचे उद्योग उभारून नवा आदर्श निर्माण केल्याचं, राठोड यांनी सांगितलं.

****

'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनानिमित्त' सामाजिक न्याय विभागाच्या योजना आणि अंमलबजावणी या विषयावर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांची विशेष मुलाखत आकाशवाणीवरच्या दिलखुलास या कार्यक्रमातून आज आणि उद्या प्रसारित होणार आहे. सकाळी सात वाजून २५ मिनिटांपासून ही मुलाखत ऐकता येईल. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात ही मुलाखत उद्या रात्री ८ वाजता प्रसारित होणार आहे.

****

प्रसिद्ध चित्रपट अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक मनोजकुमार यांचं काल सकाळी मुंबईच्या कोकिलाबेन रुग्णालयात निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. विशेषतः देशभक्तिपर चित्रपटांमध्ये भूमिका केलेल्या मनोज कुमार यांना भारत कुमार या नावानं ओळखलं जात होतं. चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या कारकिर्दीचा हा संक्षिप्त आढावा..

**२४ जुलै १९३७ रोजी तत्कालीन वायव्य सिंध प्रांतातल्या एबटाबाद इथे जन्मलेले मनोजकुमार यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. वो कौन थी, शहीद, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, उपकार आणि पूरब और पश्चिम हे त्यांचे चित्रपट प्रचंड गाजले. चंदेरी पडद्यावर देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखांमुळे त्यांना**

**भारतकुमार हे टोपणनाव मिळालं. चित्रपट सृष्टीत त्यांनी दिलेल्या योगदानासाठी त्यांना चित्रपट सृष्टीतल्या सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कारानं तसंच पद्मश्री सन्मानाने गौरवण्यात आलं होतं.**

मनोजकुमार यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी अकरा वाजता मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मनोजकुमार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. देशप्रेमाची भावना रुजवणारा महान अभिनेता गमावल्याची शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

****

प्रसिद्ध अभिनेते डॉक्टर विलास उजवणे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. उजवणे यांनी विविध चित्रपट आणि नाटकांसह राऊ, वादळवाट, अवंतिका आदी मालिकांमधून विविध भूमिका साकारल्या होत्या.

****

नांदेड जिल्ह्यात मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात सात महिला मजुरांचा मृत्यू झाला. नांदेड तालुक्यातील आलेगाव शिवारात काल सकाळी घडलेल्या या दुर्घटनेत दोन महिला आणि एका पुरुषाला वाचवण्यात यश आलं आहे.

या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांविषयी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. मृतांच्या कुटुंबाला पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. जखमींना ५० हजार रुपये मदत दिली जाणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काल चारचाकीच्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. वैजापूर तालुक्याच्या नांदगाव शिवारात हा अपघात झाला, वाहनचालकाचं नियंत्रण सुटलेली चारचाकी खड्ड्यात आदळून हवेत उडाली, आणि उच्च दाब विद्युत तारांवर आदळून खाली पडल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेड इथलं मध्यवर्ती बसस्थानक तात्पुरत्या स्वरुपात कौठा मैदानावर स्थलांतरीत होणार आहे. येत्या १२ तारखेपासून जुनं बसस्थानक रस्ता दुरुस्तीसाठी बंद करण्यात येणार आहे. नांदेड जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सहकार्याचं आवाहन केलं आहे.

****

ओडिशात जगन्नाथ पुरी इथं ५७ वी पुरुष आणि महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडूचा राणी लक्ष्मीबाई पुरस्कार धाराशिव जिल्ह्याच्या तन्वी भोसले हिला जाहीर झाला आहे. दरम्यान, या स्पर्धेत महाराष्ट्राचा महिला संघ अजिंक्य ठरला, तर पुरुष संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी परीक्षा आजपासून सुरु होत आहेत. चार जिल्हयातील २३७ केंद्रावर परीक्षा होत असून १२ जणांची समन्वयक समिती स्थापन करण्यात आली आहे.

****